क्र. जि.का./नै.आ./कोविड-१९/कावि-६८७/२०२१
जिल्हाधिकारी, कार्यालय, नागपूर
दिनांक २२/०५/२०२१

# परीपत्रक

**विषय :- रेमडेसिवीर इंजेक्शनचा वाटपाबाबत.**

संदर्भ :- मा. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांचे परीपत्रक जा.क्र. कोविड १९/रेमडेसिवीर इंजेक्शन/१०२-२१/१३, दिनांक ०५/०४/२०२१

आज दिनांक **२२/०५/२०२१** रोजी नागपूर जिल्हयासाठी प्राप्त झालेल्या रेमडेसिवीर इंजेक्शनचे रुग्णालय निहाय वाटप सोबतच्या यादीप्रमाणे करण्यात आलेली आहे. तरी संबंधित कोविड रुग्णालयांनी त्यांचे नावासमोर दर्शविण्यात आलेल्या संख्येप्रमाणे व औषध पुरवठादार नुसार त्यांचेकडून तात्काळ रेमडेसिवीर इंजेक्शन प्राप्त करुन घ्यावेत. कोणत्याही प्रकारची दिरंगाई,टाळाटाळ,कसूर होणार नाही याची दक्षता रुग्णालय प्रशासन व घाऊक विक्रेते यांनी घेणेचे आहे.

संबंधित कोवीड रुग्णालयांनी सदरचा औषध साठा प्राप्त करुन घेणेकामी रुग्णालयाच्या लेटर हेड वर सही शिक्यानिशी प्राधिकारपत्र **(रुग्णालयातील जबाबदार व्यक्ती किंवा रुग्णालयातील औषधालयाचे नावे)** व प्राधिकृत व्यक्तीचे फोटो ओळखपत्र घाऊक विक्रेत्याकडे सादर करणे आवश्यक आहे. याबाबतची खातरजमा करुन घाऊक विक्रेत्यांनी औषधाचे सुयोग्य वितरण सदर आदेशाचे दिनांकास मुदतीत व शासकीय/वाजवी दरात करणेचे आहे.

औषध व प्रशासन, नागपूर यांचे अधिकारी/कर्मचारी यांनी सदर वितरण तक्त्यानुसार वाटप होत असलेली व सदर वितरीत औषधांचा उचित विनियोग होत असल्याची वेळोवेळी खातरजमा करुन अनियमितता आढळलेस संबंधितांवर कारवाई करावी.

या कार्यालयाचे भरारी पथकांनी वाटप तक्त्यानुसार वाटप व विनियोगाबाबत खातरजमा करुन अनियमितता आढळलेस संबंधित रुग्णालय प्रशासन/घाऊक विक्रेते यांचेवर नियमानुसार कारवाई करुन अहवाल सादर करावा. रेमडेसिवीर इंजेक्शनचे रुग्णालय निहाय वाटप करण्यात आलेली यादी जिल्हाधिकारी नागपूर यांचे **https://nagpur.gov.in/notice/allotment-of-remdesivir-injections-to-covid-hospitals/** या संकेतस्थळावर माहितीसाठी उपलब्ध करण्यात आलेली आहे. **कोविड १९ वैश्विक साथीमध्ये काम करणारे फ्रंटलाईन वर्कर्स उदा: आरोग्य सेवा, महानगरपालिका, नगरपालिका, पोलीस, महसूल, ग्रामविकास, नगरविकास, अन्न व औषध प्रशासन , परिवहन इत्यादी विविध आस्थापनांच्या अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी १० टक्के कोटा राखीव ठेवण्याचे निर्देश मा. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांनी दिले असल्याने सबंधित फ्रंटलाईन वर्कर्स यांना आवश्यकता असल्यास रेमडेसिवीर औषध प्राधान्याने देण्यात यावे.**

दिलेल्या मुदतीत इंजेक्शनची उचल न करण्यात आल्यास शिल्लक इंजेक्शन पुनर्वाटप करण्यात येतील.

जिल्हाधिकारी, नागपूर तथा
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नागपूर करीता

**HOSPITALWISE ALLOTMENT OF REMDESIVIR ON 22-05-2021- NAGPUR DISTRICT ALLOTMENT AS PER NO. OF ADMITTED PATIENTS - (MORNING REPORT) OF NMC**

| SR. NO | DESHMANE HOSPITAL | URBAN/ RURAL | REMDESIVIR ALLOTMENT | NAME OF DISTRIBUTOR FROM WHOM TO COLLECT |
|---|---|---|---|---|
| 41 | EVERSHINE HOSPITAL | NAGPUR URBAN | 4 | ASPIRE PHARMACEUTICALS (9975043605) REALLOTED |
| 63 | KRIMS HOSPITAL | NAGPUR URBAN | 40 | ASPIRE PHARMACEUTICALS (9975043605) REALLOTED |
| 120 | SENGUPTA HOSPITAL | NAGPUR URBAN | 10 | ASPIRE PHARMACEUTICALS (9975043605) REALLOTED |
| 9 | ASHA HOSPITAL | KAMPTEE | 60 | ASPIRE PHARMACEUTICALS (9975043605) REALLOTED |
| 16 | MULTICARE HOSPITAL, KORADI | KAMPTEE | 6 | ASPIRE PHARMACEUTICALS (9975043605) REALLOTED |
| 31 | SHRI SAI MULTISPECIALITY HOSPITAL, BUTIBORI | NAGPUR RURAL | 4 | ASPIRE PHARMACEUTICALS (9975043605) REALLOTED |